# MAHARASHTRA ACT No. LV OF 1975

## THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS AND MUNICIPAL CORPORATIONS (POSTPONEMENT OF ELECTIONS DURING EMERGENCY) ACT, 1975

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ११ डिसेंबर १९७५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,

सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. LV OF 1975

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO MUNICIPAL COUNCILS AND MUNICIPAL CORPORATIONS DURING THE PERIOD OF THE EMERGENCY DECLARED ON THE 25TH DAY OF JUNE 1975.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १३ डिसेंबर १९७५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५

**दिनांक २५ जून १९७५ रोजी जाहीर केलेल्या आणीबाणीच्या कालावधीत नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक**

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, ज्यांची मुदत संपली आहे अथवा संपत आली आहे अशा काही नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्या सार्वत्रिक आणि पोट-निवडणुका नजिकच्या भविष्यकाळात घेणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, दिनांक २५ जून १९७५ रोजी जाहीर केलेल्या आणीबाणीमुळे अशा निवडणुका घेण्यासाठी ज्यांची आवश्यकता आहे असे शासकीय आणि नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना आणीबाणीच्या कालावधीत हाती घ्यावयाच्या इतर कार्यक्रमाकडे आपली सर्व शक्ती लावणे आवश्यक होते आणि परिणामी ते निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध होऊ शकणार नव्हते ; तसेच, अशा कालावधीत अशा निवडणुका घेणे हे सामान्य जनतेसही गैरसोयीचे झाले असते ;

आणि ज्याअर्थी, या आणि यात पुढे दिलेल्या इतर कारणांस्तव, अशा निवडणुका लांबणीवर टाकणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, निवडणुका अशा रीतीने लांबणीवर टाकण्याच्या परिणामी विवक्षित नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्या सदस्यांचा (अध्यक्षांसह) व प्रशासकांचा पदावधी वाढविणे आणि उपरोक्त बाबींशी संबंधित अशा प्रयोजनांसाठी तरतूद करणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, निवडणुका लांबणीवर टाकणे आणि पूर्वोक्तप्रमाणे पदावधी वाढवणे आणि पूर्वोक्त बाबींशी संबंधित प्रयोजनांसाठी तरतूद करणे याकरिता राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती ; आणि म्हणून त्यांनी महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (आणीबाणीच्या कालावधीत निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७५ हा १८ सप्टेंबर १९७५ रोजी प्रख्यापित केला ;

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या विवक्षित फेरबदलांसह, उक्त अध्यादेशाचे राज्यविधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ आणि मुदत. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (आणीबाणीच्या कालावधीत निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ असे म्हणता येईल.

(२) तो, १८ सप्टेंबर १९७५ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

(३) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५२, खंड (१) अन्वये दिनांक २५ जून १९७५ रोजी जाहीर झालेली आणीबाणीची उद्‌घोषणा अंमलात असेपर्यंत आणि त्यानंतर सहा महिनेपर्यंत किंवा शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्य शासन अधिसूचित करील अशा त्यापूर्वीच्या तारखेपर्यंत तो अंमलात राहील आणि त्यानंतर समाप्त होईल. या अधिनियमाच्या समाप्तीनंतर महाराष्ट्र अधिनियमाद्वारेच तो निरसित केला असल्याप्रमाणे मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७, त्यास लागू होईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर या अधिनियमात—

(अ) 'प्रशासक' म्हणजे कोणत्याही अधिक्रांत किंवा विघटित नगरपालिकेची किंवा महानगरपालिकेची कर्तव्ये आणि कामे पार पाडण्यासाठी आणि त्यांच्या शक्तींचा वापर करण्यासाठी संबद्ध अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो ; आणि त्यात महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ च्या कलम ३१३ अन्वये नियुक्त केलेल्या किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या परिशिष्ट चार, भाग चार, परिच्छेद २२ अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकाचा अंतर्भाव होतो ;

(ब) 'नगरपालिका' म्हणजे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये प्रस्थापित नगरपालिका ;

(क) 'महानगरपालिका' म्हणजे मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये प्रस्थापित महानगरपालिका ;

(ड) नगरपालिका किंवा महानगरपालिका यांच्या संबंधात 'संबद्ध अधिनियम' म्हणजे वरील खंड (ब) किंवा (क) मध्ये निर्देश केलेल्या अधिनियमांपैकी ज्या अधिनियमान्वये ती प्रस्थापित झाली असेल तो अधिनियम ;

(ई) नगरपालिका किंवा महानगरपालिका यांच्या संबंधात या अधिनियमात वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संबद्ध अधिनियमात जे अर्थ नेमून देण्यात आले आहेत तेच त्यांचे अर्थ असतील.

**निवडणुका लांबणीवर टाकणे व पदावधी वाढविणे इत्यादी.**

३. संबद्ध अधिनियमात किंवा तदन्वये करण्यात आलेल्या नियमात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी---

(अ) हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत कोणत्याही नगरपालिकेच्या सदस्यांची किंवा अध्यक्षाची किंवा कोणत्याही महानगरपालिकेच्या सदस्यांची सार्वत्रिक निवडणूक आणि अशा सदस्यांचा कोणत्याही सदस्याची किंवा अध्यक्षाची कोणतीही नैमित्तिक रिकामी झालेली जागा भरण्यासाठी कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही (किंवा जर कामास सुरुवात करण्यात आली असेल व मतदान झालेले नसेल तर अशी कोणतीही निवडणूक पूर्ण करण्यात येणार नाही) ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस जे पदावर असतील असे सर्व नगरपालिका सदस्य आणि नगरपालिकांचे अध्यक्ष (मग ते निर्वाचित, नामनिर्दिष्ट, नियुक्त, स्वीकृत किंवा पदसिद्ध कसेही असोत) आणि महानगरपालिकांचे सर्व सदस्य यांचा पदावधी (मग त्यांचा पदावधी, उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा उक्त तारखेनंतर हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत कोणत्याही वेळी संपणार असो) वाढविण्यात आल्याचे किंवा यथास्थिति वाढविण्यात यावयाचा असल्याचे मानण्यात येईल ; व असा सदस्य किंवा अध्यक्ष, हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, पद धारण करण्याचे चालू ठेवील ;

(क) कोणत्याही नगरपालिकांच्या किंवा महानगरपालिकांच्या, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस जे पदावर असतील अशा, प्रशासकांचा पदावधी (मग त्यांचा पदावधी उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा उक्त तारखेनंतर हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत कोणत्याही वेळी संपणार असो), वाढविण्यात आल्याचे किंवा यथास्थिति वाढविण्यात यावयाचा असल्याचे मानण्यात येईल ; आणि असे प्रशासक किंवा त्यांच्या ऐवजी प्रशासक म्हणून वेळोवेळी नेमलेल्या इतर कोणत्याही व्यक्ती, हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी नगरपालिकांचे सदस्य व अध्यक्ष आणि प्रशासक व महानगरपालिकेचे सदस्य आणि प्रशासक यांचा, या अधिनियमाद्वारे वाढवण्यात आलेला पदावधी संपल्यानंतर, रचना करण्यात आलेल्या किंवा पुनर्रचना करण्यात आलेल्या नगरपालिकेच्या किंवा यथास्थिति महानगरपालिकेच्या ज्या सभेत गणपूर्ती असेल अशा पहिल्या सभेच्या दिवसाच्या त्या पूर्वीच्या दिवसापर्यंत ते पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

**सदस्य नामनिर्देशित करण्याची शक्ती.**

४. मागील पूर्ववर्ती कलमामध्ये किंवा संबद्ध अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाच्या मते, गणपूर्ती नसण्याच्या कारणावरून एखादी नगरपालिका किंवा महानगरपालिका संबद्ध अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधी या अन्वये तिला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्यास किंवा तिच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यास आणि कामे करण्यास असमर्थ असेल, तर राज्य शासनास, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, यथोचितरीत्या अर्हताप्राप्त अशा व्यक्तींचे त्यास आवश्यक वाटेल इतक्या संख्यने मागील पूर्ववर्ती कलमाच्या खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीपेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरिता, नामनिर्देशन करता येईल.

**ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला आहे असे सदस्य इत्यादींच्या विवक्षित कृत्यांना विधिग्राह्यता देणे.**

५. कलम ३ अन्वये ज्यांचा पदावधी वाढवण्यात आल्याचे समजण्यात आले असेल किंवा यथास्थिति ज्यांचा पदावधी वाढवण्यात आला असेल असे नगरपालिकांचे सर्व सदस्य, अध्यक्ष व प्रशासक आणि महानगरपालिकांचे सर्व सदस्य व प्रशासक हे वाढवण्यात आलेल्या संपूर्ण मुदतीतसुद्धा (या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असो वा प्रारंभानंतर असो), असे सदस्य किंवा अध्यक्ष किंवा यथास्थिति प्रशासक म्हणून सर्व शक्तींचा वापर करण्यास व सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व ते तसे करण्यास सक्षम असतील ; आणि उक्त मुदतीत कोणत्याही नगरपालिकेने किंवा महानगरपालिकेने अथवा अशा सदस्याने, अध्यक्षाने किंवा प्रशासकाने केलेले, कोणतेही कृत्य हे, पदावधी वेळेवर वाढवण्यात आला नव्हता किंवा तो अन्यथा यथोचितरीत्या वाढवण्यात आला नव्हता किंवा पदावधी वाढवण्यात आल्याच्या मुदतीत नगरपालिका, महानगरपालिका, सदस्य, अध्यक्ष किंवा प्रशासक यांना नगरपालिका, महानगरपालिका, अध्यक्ष किंवा यथास्थिति प्रशासक यांच्या सर्व शक्तींचा वापर करता येत नव्हता व त्यांची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडता येत नव्हती याच केवळ कारणावरून, विधिअग्राह्य असल्याचे समजण्यात येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात त्याविरुद्ध आक्षेप घेता येणार नाही.

संबध्द अधिनियम लागू असणे.

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ती खेरीजकरून संबद्ध अधिनियम हा संबंधित नगरपालिका व महानगरपालिका यांच्या संबंधात इतर सर्व बाबतींत लागू असेल.

अडचणी दूर करणे.

७. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या आधारे किंवा या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणत्याही संबद्ध अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास राज्य शासनास, प्रसंगानुसार, आदेशाद्वारे, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती.

८. (१) महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (आणीबाणीच्या कालावधीत निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, या अधिनियमान्वये सुधारलेल्या त्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये केलेली गोष्ट किंवा कृती असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**
प्रभारी भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.